The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि जीवन व्यवहार

**पल्लवी महाडिक**

संतांची चळवळ हा भारतातील प्रबोधन काळ आहे. संत साहित्याचा प्रभाव मराठी साहित्यावर अबाधित आहे. संत साहित्याचा नव्याने अभ्यास होत राहिलेला आहे. तो केवळ महाराष्ट्र अन भारतापुरता मर्यादित राहिलेला नसून विदेशांमध्ये, विदेशी भाषांमध्ये पोहोचलेला आहे. सन 1960 नंतरच्या कालखंडामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी असे साहित्याचे प्रवाह निर्माण झाले. संत साहित्य प्रथमतः समजून घेताना संतांचे बहु आयामित्व लक्षात घेतले पाहिजे. आजच्या आधुनिक काळात संत साहित्याचे मूल्यमापन करताना सामाजिक विचारांचे, संकल्पनांचे निकष महत्त्वाचे ठरतात.

संतांचे स्वानुभव, जीवनदृष्टी व जीवननिष्ठा लक्षात घेणे गरजेचे आहे. संत साहित्यातून व्यक्त होणारी भावदृष्टी, भावसाधना, महाभाव स्थिती यांचे आकलन महत्वपूर्ण ठरते.

"अधिकार तैसा करू उपदेश" या उक्तीप्रमाणे संतांचा तत्व विचार, नीतीबोध, स्वानुभव प्रकट होत असतात.

विद्रोहातून सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर मात करत समाजकल्याण हितसाधनेच्या उदात्त भावनेतून संत साहित्य निर्माण झाले.

संत साहित्य आत्मसात करणे, समजून घेणे, त्याच्याशी एकरूप होणे, तादात्म पावणे म्हणजेच हे विश्वचि माझे घर या उक्तीचा बोध होऊन जातो. थोडक्यात विश्वरूप होऊन जगणे म्हणजे संत साहित्य.

रोजचे जगणे, रोजचा संघर्ष, संयम व परिस्थिती आणि त्यातून पुढे वाटचाल करत राहणे असा सूर संत साहित्यातून जन माणसांपर्यंत पोहोचवला जातो आहे.

संत साहित्य हे केवळ मंदिरात पूजनीय ठेवायचे की प्रत्यक्ष अंमलात आणायचे जीवन व्यवहारात उपयुक्त ठरेल असे आत्मसात करायचे. कारण जे उदात्त आहे ते नक्कीच उन्नत आहे ही प्राचीन काळापासूनची आपली दृढ भावना आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक नैतिक मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो आहे. तेव्हा हेच संत साहित्य सामान्य जन माणसांना तारण्याचा प्रयत्न करताना दिसते.

संत साहित्य हे डोळे उघडे ठेवून आत्मसात करण्याचे साहित्य आहे. संत साहित्य म्हणजे केवळ मंदिर, परमेश्वर त्यांच्या जुनाट संकल्पना नाहीत तर विज्ञानाचीही कास धरायला लावणारे साहित्य होय.

आजच्या जीवन व्यवहारात संत साहित्य म्हणजे कंटाळवाणे कीर्तन, परमार्थ संकल्पना आणि तदनंतर निवृत्ती असाच विचार समाजात प्रचलित होताना दिसतो आहे. परंतु संत साहित्य हे रोजच्या दैनंदिन जीवन व्यवहाराशी इतके संलग्न आहे की अमुर्ताकडून मुर्ताकडे, सामान्याकडून विशिष्टाकडे मानवी जीवनाला उपयुक्त ठरणारे सर्व ज्ञान संत साहित्यामध्ये आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात अस्तित्वासाठी संघर्ष तीव्र होताना आपण पाहतो आहे. धावपळ हेच आजच्या जीवन व्यवहाराचे गणित होऊन बसले आहे. तणाव, रोजची धावपळ, संघर्ष यापासून मुक्ती हवी असेल तर संत परंपरेतील समर्थ रामदास सांगतात :-

काही गलबला काही निवळ |
ऐसा कंठित जावा काळ ||

आजच्या स्पर्धेच्या युगात सादरीकरण आणि खोटा दिखाऊपणा इतके जीव घेणे ठरते आहे याची पुसटशी कल्पनाही जन माणसाला नसावी का ? त्यामुळे कर्जबाजारीपणा, नैराश्य, आत्महत्या, नकारात्मक विचार मानसिकता या दरीमध्ये कोसळला जात आहे.

असाच नकारात्मक दुःखांचा डोंगर जगतगुरू संत तुकोबाराय यांच्यावरतीही कोसळला होता. पण त्यांनी आत्महत्या अशी पावले न उचलता संकटांना ठणकावून सांगतात:-

बरे जाले देवा निघाले दिवाळे |
बरी या दुष्काळे पीडा केली ||
अनुतापे तुझे राहिले चिंतन |
जाला हा वमन सवंसार ||

संत तुकाराम महाराजांप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराजांनाही छोट्याशा आयुष्यात अपमान, अवहेलना, विटंबना सहन करावी लागली. पण त्याचा त्यांच्या लेखणावर कुठेही पडसाद उमटू दिला नाही.

याउलट ते सांगतात :-

जो जे वांछिल |
तो ते लाहो प्राणीजात ||

यावरून त्यांची जीवन व्यवहाराच्या कठीण परिस्थितीही जन माणसांविषयीची उदात्त भावना दिसून येते.

माणसाजवळ बुद्धी आहे म्हणून त्याने विज्ञानामध्ये प्रगती केली. मनुष्य चांगले - वाईट कर्म करत असतो. पण त्याची लक्ष्मण रेषा आखून देण्याचे कार्य संत साहित्य करत असते. संत साहित्यातील भाबडेपणा, अंधश्रद्धा असा चुकीचा पायंडा समाजात पसरविला जात आहे याची खंत वाटते. याउलट जर संत साहित्याचा मतितार्थ सर्व समाजातील घटकांनी समजून घेतला तर लौकिक जीवन चांगले जगता येईल.

तीर्थांमध्ये काशी, व्रतांमध्ये एकादशी,
साहित्यांमध्ये तैसे संत साहित्य शोभिवंत ||

तंत्रज्ञानाच्या जोडीला रोजच्या जीवनातील व्यवहारांना उपयुक्त असे संत तत्त्वज्ञान, संत साहित्य, संत आचरण या सर्वांच्या मिलापातूनच अपेक्षित असे विश्व कल्याण पसायदान साकारले जाणार आहे.